# वर्धा जिल्हा पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन

वर्धा जिल्हा पोलीस दलातर्फे वर्धा जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते, कोरोना विषाणू संसर्गाबाबत सध्या सोशल मिडियावरती वेगवेगळी माहिती प्रसारित होत असून घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर अफवा पसरविण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्या अनुषंगाने सर्व नागरिकांना कळविण्यात येते कि, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका. कोणत्याही घटनेची/माहितीची सत्यता न पडताळता कोणताही मेसेज व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम व इतर सोशल मिडीया अप्लिकेशनवर प्रसारित करू नये. अशा मेसेज प्रसारित केल्यास आणि त्यावरून अनुचित प्रकार घडल्यास संबंधीतावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

वर्धा जिल्हा पोलीस दलातील सोशल मिडिया मॉनिटरींग सेल अशा पोस्टवर लक्ष ठेवून आहेत. सर्वांनी सोशल मिडीयाचा वापर जबाबदारीने करावा. आपण सर्वांनी शांतता, सामाजिक सलोखा राखण्यास व कोरोना विषाणू संसर्गाबाबत नियंत्रण व प्रतिबंध करण्याकरीता पोलीस दलास सहकार्य करावे.

-: पोलीस अधीक्षक कार्यालय वर्धाद्वारे जनहितार्थ :-